# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 20 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २० ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

शेतकऱ्यांनी पाच रुपये किंमतीनं विकलेली भाजी, ग्राहकाला पन्नास रुपये दरानं विकत घ्यावी लागते, या तफावतीच्या अंतराला कमी करण्याची आवश्यकता असल्याचं केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं कृषी संमेलनात ते काल बोलत होते. कृषी उत्पादनांच्या किंमती आणि संबंधित उत्पादनांच्या व्यावसायिक किमान आधारभूत मुल्यांमधल्या मोठ्या असमानतेला दूर करण्यासाठी सरकारतर्फे एक समिती स्थापन केली जाणार असल्याचंही ते म्हणाले. लवकरच सुरु करण्यात येणार असलेल्या 'कृषी चौपाल' योजनेद्वारे प्रत्यक्ष शेती क्षेत्र आणि कृषी संशोधन प्रयोगशाळा यातील दरी कमी करुन, कृषी विषयक उपयुक्त माहिती थेट उपलब्ध करुन देणार असल्याचं चौहान यांनी यावेळी सांगितलं. शेती हाच भारताच्या अर्थकारणाचा कणा असून त्याच्या बळकटीकरणाशिवाय कोणताच विकास शक्य नसल्याचं केंद्रीय कृषी मंत्री म्हणाले.

****

भारतीय सैन्याला भविष्यवेधी ठेवण्यासाठी, बदलत्या जागतिक परिस्थितीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाह उपयुक्त अशी परिसंस्था केंद्र सरकारनं उपलब्ध करून दिली आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्ली इथं एका कार्यक्रमात बोलत होते. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता–ए.आय.च्या आधारानं लष्करी डावपेच विश्लेषण अधिक अचूक होऊ शकतं असं ते म्हणाले. आता युद्ध पूर्वीसारखं फक्त जमीन, पाणी–आकाशापुरतंच मर्यादित न राहता ते माहिती अर्थात डाटाच्या आधारावर आणि सायबर जगत तसंच अवकाशातसुध्दा लढलं जात आहे असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, यु ट्यूब अशा सामाजिक संपर्क माध्यमांवर मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणारी माहिती प्रसारित होत आहे. ही माहिती काढून टाकण्यासाठी संबंधित माध्यमांच्या समन्वयक अधिकाऱ्यांना राज्य पोलिसदलाच्या सायबर विभागानं नोटीस पाठवल्या आहेत. आतापर्यंत अशी तिनशे ठिकाणची माहिती काढून टाकण्यात आली असल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे.

****

न्यूझीलंडनं भारताविरुद्धच्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना जिंकून मालिकेत एक – शून्य अशी आघाडी घेतली आहे. न्यूझीलंडनं आज बंगळुरू इथं भारतावर आठ गडी राखून मात केली. विजयासाठी असलेलं १०७ धावांचं लक्ष्य न्यूझीलंडनं विल यंगच्या नाबाद ४८ आणि रचिन रविंद्रच्या नाबाद ३९ धावांमुळं सहज साध्य केलं. पहिल्या डावातला शतकवीर रचिन रविंद्र सामनावीराचा मानकरी ठरला. या मालिकेतला दुसरा कसोटी सामना येत्या २४ तारखेपासून पुणे इथं खेळवला जाणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात काल रात्री सर्वदूर दमदार पाऊस झाला. आज सकाळीही पाऊस सुरू होता. जिल्ह्यातल्या दहा महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सर्वाधिक नांदेड तालुक्यात तर तुलनेनं अर्धापूर तालुक्यात कमी पाऊस झाला. जिल्ह्यातल्या लोहा तालुक्यातल्या लिंबोटी इथल्या अप्पर मानार धरणाचे पाच दरवाजे आज सकाळी सहा वाजता उघडण्यात आले. धरणातून अडीचशे घनफूट प्रतिसेकंद वेगानं विसर्ग सुरू आहे. नांदेडच्या विष्णुपूरी प्रकल्पाचं एक दारही उघडण्यात आले आहे. नांदेडमध्ये गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे.

भंडारा जिल्ह्यात काल संध्याकाळ नंतर मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे शेतातल्या उभ्या पिकासह कापून ठेवलेल्या धान पिकाचं नुकसान झालं असून ठिकठिकाणी शेतात पाणी साचलं आहे.

****

बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा निवडणूक मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीकडून प्रियंका खेडकर या इतर मागासवर्गीय–ओ.बी.सी. उमेदवारास उमेदवारी जाहीर झाली आहे. चकलांबा गावच्या विद्यमान सरपंच असलेल्या खेडकर यांनी आज सकाळी प्रचाराला चकलांबा इथूनच प्रारंभ केला आहे. अजित

पवार गटाकडून विजयसिंह पंडित, महाविकास आघाडी कडून लक्ष्मण पवार यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड इथं तीन दिवसीय राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेचा आज दुसरा दिवस आहे. श्री गुरुगोबिंदसिंघजी क्रीडा संकुलात सुरू या स्पर्धेत चौदा -सतरा- एकोणवीस वर्षाखालच्या वयोगटातले राज्यभरातले खेळाडू सहभागी झाले आहेत. काल मतदार जनजागृतीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत स्पर्धेच्या पहिल्या दिवशी स्पर्धेतल्या खेळाडूंसह नव मतदारांना मतदान करण्याविषयी शपथ देण्यात आली.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मौजे ब्रम्हपुरी इथल्या गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता – सुव्यवस्थेसाठी येत्या १९ नोव्हेंबर पर्यंत प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलं आहे. यासंदर्भात नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले असून आज सकाळपासून ते लागू झाले आहेत. जिल्हा प्रशासनांतर्गत परवानगी प्राप्त भाविकांनाच इथं प्रवेश दिला जाणार असल्याचं प्रशासनानं म्हटलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात, सध्याच्या सणाच्या काळात भाडेवाढ करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांकडून वाजवीपेक्षा जास्त प्रवासी भाडे आकारल्यास प्रवाशांना त्याची तक्रार करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाच्या ई-मेल सुविधेचा वापर करावा असं आवाहन विभागिय प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****